वाचनालय,
मराठी ग्रंथ संग्रहालय
११३९३
IRBK-0111393

(१५ ७ [redacted]

७४९१८ [redacted]
१५/३/७९

# केलं म्हणजे होतं

३६९२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
...५४९१८... दि. ...
...३६९२... नोंद दि. १५/३/७९

लेखक

मा. कृ. कोकाटे

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
...७७३६३ नों दि ...
वि. ...

IRBK-0111393

IRBK-0111393

मराठी ग्रं...

किंमत १ रुपया

# निवेदन

आपल्या देशात सध्या साक्षरता-प्रसाराची मोहीम जोरात चालू आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर १९४७ साली आपल्या महाराष्ट्रात कर्मवीर गु. बाबुराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली समाजशिक्षण कमिटी नेमली गेली. त्या कमिटीला एक गॅझेटेड ऑफिसर चिटणीस म्हणून दिला व त्यांच्या हाताखाली महाराष्ट्रभर जिल्हानिहाय मर्यादित विभाग ( कॅपॅक्ट एरिया ) निवडून ठराविक विभागावर एक " **समाज शिक्षणाधिकारी** " या हुद्याचा अधिकारी नेमून त्याच्या विभागात दरसाल एक हजार प्रौढांना साक्षर करण्याचे बंधन घातले गेले.

त्या वेळी असि. डे. ए. इ. म्हणून अ'नगर जिल्ह्यात मी काम करीत होतो. याच जिल्ह्यात माझी वरील हुद्यावर नेमणूक होऊन कोपरगाव विभाग मला दिला गेला. त्या जागेवर प्रथम कोपरगाव व पुढे कोल्हापूर येथे काम करीत असताना जे अनुभव आले व ज्या गरजा निर्माण झाल्या त्यामध्ये प्रौढांसाठी वाङ्मयाची फार मोठी उणीव दिसली. तसेच त्यांच्या जीवनाशी संबंध असलेले असे वाङ्मय तयार करण्यास कमिटीकडून उत्तेजन दिले गेले. त्या वेळी 'समाज-शिक्षण' पुस्तक १ ले व 'समाज-शिक्षण' पुस्तक २ रे अशी दोन पुस्तके मी लिहिली. या पुस्तकांचा उपयोग प्रौढांना साक्षर करण्यासाठी चांगला झाला. परंतु सध्या समाज-शिक्षण घेऊन साक्षर झालेल्या प्रौढांना साक्षरतेनंतर ती साक्षरता टिकवण्यासाठी वाङ्मयाची फार मोठी गरज निर्माण झालेली आहे. अशा प्रकारचे वाङ्मय फारसे उपलब्ध नाही व ते नसल्यामुळे साक्षर प्रौढ परत निरक्षर बनण्याचा धोका आहे.

नवसाक्षर प्रौढांना वाचायला योग्य असे वाङ्मय म्हणजे कहाणी वाङ्मय. कहाणी तर खरीच पण जी प्रौढांना सहज वाचता येईल व त्या कहाणीने प्रौढांची करमणूक होईल आणि त्या गोष्टीतून त्यांना काही व्यावहारिक शिकवण मिळेल अशा तऱ्हेच्या गोष्टींची निवड करणे जरूर होते. म्हणून शिक्षण घेत असताना त्या प्रौढांत विश्वास उत्पन्न व्हावा, या भावनेने ज्या गोष्टी मी त्यांच्यापुढे ठेवीत होतो अशा ज्या गोष्टी मजकडे होत्या त्या सोप्या भाषेत आणि नवसाक्षरांत वाचनाची गोडी निर्माण होईल अशा प्रकारे मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे आणि मला विश्वास वाटतो की, तो उद्देश या पुस्तकाने सिद्धीस जाईल.

या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामी पुणे येथील प्रतिभा मुद्रणालयाचे मालक श्री. जोशी–लोखंडे यांनी माझ्या या अल्पशा कृतीला उचलून धरले व अल्पावधीतच पुस्तक प्रकाशित करून नवसाक्षर वाङ्मयास उत्तेजन देण्याचे एक महान कार्य हाती घेतल्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन मी आपले निवेदन संपवतो.

वसंत कॉलनी, सांगली
१४ जानेवारी १९६५

मा. कृ. कोकाटे

ज्यांनी आपल्या आजवरच्या आयुष्यात स्वातंत्र्य-चळवळीच्या काळात व
त्यानंतरच्या विधायक कार्यात सांगली जिल्हा बनवून सांगलीस सहकारी
उद्योगधंद्यांचे केंद्रस्थान बनविले; सहकारी साखर कारखाना,
औद्योगिक वसाहत, कोंबड्या पालन केंद्र इत्यादी विविध कार्यांचे
डोंगर उभे केले; कागद कारखाना, सूतगिरणी, डिस्टिलरी,
सहकारी ऑईल मिल्स् वगैरे काढून आपल्या कृतीने
अक्षरशः 'केलं म्हणजे होतं' हे सिद्ध करून दाखविले त्या

सांगली जिल्ह्याचे शिल्पकार



दे. भ. आमदार वसंतरावदादा पाटील

यांना

सादर अर्पण

# प्रस्तावना

माझे मित्र श्री. माधवराव कोकाटे यांनी सात गोष्टींचे पुस्तक लिहिले आहे. गोष्टी साध्या भाषेत लिहिल्या आहेत. कोणाही नवसाक्षरास त्या समजाव्यात, हा त्यांचा हेतू. तो हेतू साध्य झाला.

सर्व गोष्टींपासून काही तत्त्वज्ञानही घेण्यासारखे आहे; परंतु या गोष्टींत तत्त्वज्ञानापेक्षा व्यवहार जास्त आहे. असा व्यवहार पाहणे हे सर्वांचे लक्षात आले पाहिजे—मग माणूस कमी किंवा अधिक शिकलेला असो. व्यवहार हा त्याच्या तत्त्वज्ञानापेक्षा थोडा निराळा असतो.

नवसाक्षरांकरिता गोष्टी जशा असावयास पाहिजेत तशा त्या आहेत. मनाला थोडा चटका लावतील अशा आहेत. त्यांच्या या गोष्टींपासून आमचे नवसाक्षर झालेले लोक काही तरी शिकतील, असे वाटते.

या गोष्टींच्या पुस्तकापासून दुसरी अनेक पुस्तके त्यांचे वाचण्यात येवोत हीच इच्छा !

बा. ग. जगताप

# १. केलं म्हणजे होतं

★

एक होता राजा आणि एक होती त्याची राणी. राजाला शिकारीचा नाद होता. तो नेहमी जंगलात शिकारीस जायचा आणि शिकार करून परत आला, म्हणजे शिकारीतील आपला पराक्रम आपल्या राणीला सांगायचा. मनातून त्याला वाटत असे की, राणीनें आपल्याला म्हणावे, ' महाराज ! अशा रीतीने आपला जीव धोक्यात घालत जाऊ नका. ' तसेच आपल्या पराक्रमाचे बायकोने कौतुक करावे; पण राणी बिचारी शांत होती. शिकारीची हकीकत राजाकडून ऐकली म्हणजे ती एवढेच म्हणे की, त्यात काय आहे महाराज ! केलं म्हणजे होतं. हे राणीचे बोलणे ऐकल्यावर राजाच्या आनंदावर पाणी पडे आणि तो नाराज होई.

पण पुन्हा शिकार करून आला, की ते विसरे आणि पुन्हा शिकारीची हकीकत राणीला सांगायला लागे आणि राणी सर्व ऐकल्यावर म्हणे, " त्यात काय आहे महाराज ! केलं म्हणजे होतं. " व पुन्हा राजा नाराज होई.

एक वेळ खरोखरीच राजाच्या शिकारीत फार मोठा वाघ उठला. राजाचा नेम चुकला. वाघ राजावर चालून आला. राजाची बंदूक बाजूला पडली आणि राजाची व वाघाची झटापट सुरू झाली. वाघाने राजाला बरेच जखमी केले. इतक्यात संधी साधून नोकराने वाघाच्या छातीला नळी लावून बंदूक उडाविली व वाघ मेला. आणि राजाचा जीव वाचला.

जखमी स्थितीत राजाला राजवाड्यात आणलं. डॉक्टर, हकीम, वैद्य जमा झाले. सर्व जखमा बांधल्या, अनेक लोक समाचारास

धावले, राजाला पाहून गेले. लोकांची वर्दळ कमी झाली व राणी-साहेब महाराजांच्या समाचारास आल्या. राणीला पाहताच राजाला पुन्हा जाग आली आणि तो शिकारीची हकीकत सांगू लागला, सगळे ऐकल्यावर राणीसाहेब नेहमीप्रमाणे म्हणाल्या, " त्यांत काय आहे महाराज ! केलं म्हणजे होतं. "

आता मात्र राजाला राग आला आणि त्यानं ' नको ही बायको आपल्याला ! ' म्हणून प्रधानाला सांगितले. द्या हिला हाकलून ! दूर जंगलात सोडून द्या आणि केलं म्हणजे होतं ! तर करू द्या तिथं काय करायचं ते ! "

प्रधानाने रथ तयार केला. राणीला रथात बसविले आणि सेवकास आज्ञा केली, ' यांना लांब जंगलात सोडून द्या.' त्याप्रमाणे सेवकाने राणीला नेले व जंगलात सोडून दिले.

राणीने विचार केला, आता काय करावं ? कुठं जावं ? ती जंगलात इकडे तिकडे भटकू लागली. तोच तिला एक झोपडी दिसली. ती झोपडीजवळ गेली. तो एका ऋषीचा आश्रम होता. राणी पुढे गेली. ऋषीने तिला पाहिले. राणीने नमस्कार केला, व आश्रय मागितला. ऋषीने सांगितले ' आपण कोणी मोठ्यांच्या बाई दिसता ! येथे राहता येणार नाही. इथं आश्रमाच्या नियमाप्रमाणं रहावं लागतं. असले भारी कपडे व दागिने वापरता येणार नाहीत. इथं स्वतःचे काम स्वतः करावं लागतं ! ' राणीनं सर्व कबूल केलं आणि राणी तिथं राहिली.

दुसरे दिवशी भारी वस्त्रे ठेवली, वल्कलं नेसली. दागिने काढून ठेवले. फुलांच्या माळा घातल्या. राणी आश्रमवासी बनली आणि तेथील नियमाप्रमाणं झाडलोट, सडासारवण, बागेला पाणी घालणे, पशूपक्ष्यांची सेवा करणे, स्वतः स्वयंपाक करणे वगैरे कामे करू लागली.

अशी रहात असता तेथील एक हत्तीण व्याली. त्या पिलाचा तिला लळा लागला. त्याच्यावर तिचे प्रेम बसले. ती त्याला मुलापेक्षाही जपू लागली. दररोज त्याला उचलून त्याच्या आईकडे न्यायचे. चार त्याच्यापुढे ठेवण्याऐवजी त्याला उचलून चाऱ्याकडे न्यायचे. पाणी आणून पाजायच्याऐवजी त्याला उचलून पाण्याजवळ न्यायचे, याप्रमाणे दररोज चालू असल्यामुळे तिला ती सवय झाली. पुढे ते हत्तीचे पिलू जरी थोडं थोडं मोठं होत गेलं तरी ती त्याला तंगड्यात हात घालून पाठंगुळीला लावून, उचलून नेत असे.

अशा रीतीने तिचा रोजचा कार्यक्रम चालू असता तोच राजा एक दिवस त्याच जंगलात शिकारीला आला. तेव्हा एक बाई हत्तीला पाठीवरून उचलून नेते व पाणी पाजून पुन्हा पाठीवर घेऊन परत आश्रमाकडे जाते हे राजाने पाहिले आणि बाई असून हत्ती उचलून नेते, हा काय प्रकार आहे? तो पहावा तरी, म्हणून तो राजा जवळच्या वाटेने येऊन तिच्यापुढे उभा राहिला.

राजा म्हणाला, " अहो ! तुम्ही बाई माणूस ! आणि एवढा मोठा हत्ती उचलून घेऊन कसे जाता ? तुम्हाला तो उचलला तरी कसा ?" ती बाई म्हणाली " त्यात काय आहे? केलं म्हणजे होतं." हे ऐकल्यावरोबर राजाला आठवण आली. माझी बायको असंच म्हणत होती. ती तर नसेल ! त्यानं बारकाईने पाहिलं. त्याला ओळख पटली.

राजा बाईचे मागोमाग आश्रमात गेला. मागील हकीकत ऋषीला सांगितली व बायकोला का सोडून दिले, तेही सांगितले. आणि मी तिला घेऊन जातो, अशी विनंती केली. ऋषींनी बाईला विचारले. तिने राजाचे म्हणणे खरे असल्याचे सांगितले. ऋषींनी बाईला जाण्याची परवानगी दिली. राणीने ऋषीचे दर्शन घेतले व आपले अलंकार-कपडे अंगावर घालून राजाराणी आपल्या घरी आले व रामाचं राज्य केलं. ◆◆◆

# २. आम्ही अवघे पाच

*

कोकणातून बाळाजी विश्वनाथ देशावर आला व सातारला जाऊन राजाचा पेशवा झाला. मुख्य प्रधान झाला. मग आपणही सातारला जाऊन पेशवा का होऊ नये? असे कोकणातील काही तरुणांच्या मनात आले. त्या पाच जणांनी देशावर जाण्याचा बेत केला.

पेशवा होण्यास काय काय लागते? एक ढाल, एक तलवार, अंगात लांब अंगरखा, पायात तंग विजार, डोक्याला पागोटे, कमरेला शेला आणि बसायला घोडा, म्हणजे झाला सरदार! झाला पेशवा!



या पाचही तरुणांनी वरीलप्रमाणे सर्व सामान जमविलें. पोषाख करून आपापल्या घोड्यावर बसले आणि कोंकणातून सातारला यायला निघाले. त्यांची घोडी चिपळूणला आली. तेथून कुंभारली घाटाने हेळवाकला आली. हेळवाकजवळून कोयना नदी वहाते. नदीवर पूल आहे त्या पुलाजवळच नदीत एक घाटी तरुण पाण्यात गुडघे ठोकीत उभा होता. त्याला हे कोंकणी स्वार दिसले व या लोकांची घोड्यावर बसण्याची आणि तरवारी धरण्याची रीत बघून यांची थोडी थट्टा करावी म्हणून तो तसाच उघडाबंब धावत पुलावर आला.

घाटी तरुण या पाच घोडेस्वारांच्या पुढे आडवा होऊन दरडावून म्हणाला, " काय रे ! कुठं चाललाय ? " हे ऐकल्याबरोबर सर्वजण थांबले. नंतर तो तरुण पुन्हा म्हणाला, " उतरा खाली ! " त्याबरोबर सर्वजण घोड्यावरून खाली उतरले. हे पाहून त्याला जोर चढला व तो म्हणाला, " ठेवा त्या ढाली आणि तरवारी ! " त्याबरोबर सर्वांनी ढाली आणि तरवारींचा ढीग त्याच्यापुढे घातला. नंतर त्या तरुणाने पुन्हा धमकावले, " काढा कपडे " ! " त्याबरोबर त्यांनी कपडेही काढले. आपल्याला हे घोडेस्वार चांगलेच भ्याले, असे त्या तरुणाने ओळखले आणि त्याला जास्तच हिंमत आली.

नंतर त्या घाटी तरुणानं त्यांतीलच एक तरवार घेतली. ती म्यानातून उपसली. एक शेला घेतला आणि त्याच्या फाडून पाच लंगोट्या केल्या, आणि त्यांना पुन्हा दरडावले. " घाला या लंगोट्या ! आणि टाका तीही धोतरं ! " ते त्यांनी एकले. शेवटी तो घाटी तरुण तरवार फिरवीत त्यांच्या अंगावर धावून म्हणाला, " मुकाट्याने जाता की नाही आल्या रस्त्याने ! की दाखवू एकेकाला काय ते ! " शेवटचे वाक्य ऐकल्याबरोबर ते पाचही तरुण परत

फिरून कोकणाच्या रस्त्याने सारखे पळत सुटले. ते पाहून तो घाटी तरुण मोठ्या आनंदाने हसत राहिला.

असे पळता पळता ते कोकणी घोडेस्वार चिपळूणजवळ आले. ती सकाळची वेळ होती. चिपळूणमधील लोक शौचविधी-साठी गावाबाहेर पडत होते. त्यांपैकी रामभटांनी शामभटांना ओळखले.

रामभट--काहो शामभट! आपण पेशवा व्हायला गेला होता ना?

शामभट--अहो! कसचा जातो अन् कसचा पेशवा होतो?

रामभट--झालं काय?

शामभट--अहो! घाटावर गेलो अन् तेथे आम्हांला अडविलं!

रामभट--अडविणारे कितीजण होते व तुम्ही किती जण होता?

शामभट--अहो तो पडला एक! आणि आम्ही अवघे पाच

रामभट--मग तुम्ही त्याच्याशी लढायचे होते?

शामभट--अहो! लढतो कसा? त्याचे हात मोकळे आणि आमच्या एका हातात ढाल आणि एका हातात तलवार!

रामभट--मग तुम्ही पळून जायचे होते?

शामभट--अहो! पळतो कसा? तो होता पायी आणि आम्ही पडलो घोड्यावर!

सारांश, या पाच मूर्खांना आपल्या सामर्थ्याची जाणीव नव्हती. सातजण असल्यामुळे आपण एकाला भारी आहोत. शिवाय हत्यारबंद असल्यामुळे या बिनहत्यारी माणसाला सहज जिंकू. त्याचप्रमाणे घोड्यावर असल्यामुळे सहज जलद निघून जाऊ. या-

साठी कोणाही माणसाने अज्ञानी रहाणे चांगले नाही. सर्वांनी शिकले पाहिजे. एकजुटीने वागले पाहिजे.

मागे इंग्रज आले. ते थोडे लोक होते. त्यांना आम्हां भारतामधील लोकांना जिंकले. आमच्यावर राज्य केले, कारण ते शहाणे होते. आता देखील आपण पहातो, जो समाज शहाणा आहे तो सुखाने रहातो व अडाणी समाजाला राबवतो. त्यांच्याकडून सेवा करून घेतो. गावात जो शाहणा मनुष्य असतो, त्याच्या हातात गावाचा कारभार जातो. घरात जो शाहाणा असतो तो घरचा कारभारी होतो. आता स्वराज्य आले आहे. ते लोकशाही पद्धतीने राबवावयाचे आहे. शहाणी व जाणती माणसे निवडून दिली पाहिजेत, नाहीतर कारभार नीट चालणार नाही. योग्य माणूस कोण? हे शिकून शहाणपण मिळविल्याखेरीज कळणार नाही. नाहीतर आम्ही पुष्कळ लोक असूनसुद्धा आमच्या हातात राज्यकारभार येणार नाही. वरील पाच जणांची जी गत झाली ती आमची होईल. एक शाहणा पाच अडाणी माणसांना भारी असतो. म्हणून शिकून शहाणे झाले पाहिजे.

◆७◆

# ३. राजा फांशी गेला

★

एक होता राजा. तो होता अडाणी. त्याला खरं-खोटं कळत नव्हतं. न्याय-अन्याय कळत नव्हता. कोणाचेंही म्हणणं त्याला खरं वाटे. त्याप्रमाणे तो निकाल देई.

एकदा गावात सावकाराच्या घरावर दरवडा पडला. माडीची खिडकी उघडी होती. चोरांनी खिडकीच्या गजांना दोर बांधला. त्या दोरावरून वर जायचे, माडीच्या जिन्याने खाली उतरायचे आणि चोरी करायची, असा चोरांनी बेत केला. चोर दोराला धरून चढू लागले. पुढारी पुढे झाला. बाकीचेही चढू लागले. चोरांच्या ओझ्याने खिडकी निसटली आणि सगळेच खाली पडले. पुढारी अधिक उंचावरून पडला त्याचा मोडला पाय.

दुसरे दिवशी, चोरांचा पुढारी लंगडत लंगडत राजाकडे गेला.

चोर--महाराज ! माझा पाया मोडला. आता मी काम कसे करूं व जगूं कसा ?

राजा—अरेरे ! कसा मोडला तुझा पाय ?

चोर—महाराज ! सावकाराच्या घरावर दरवडा घालण्यासाठी गेलो. दरवाजा बंद होता. खिडकीला दोर लावून चढू लागलो वर गेल्यावर खिडकी निसटली व एकदम जमिनीवर आदळलो आणि माझा पाय मोडला.

राजा—बोलवा त्या सावकाराला ! ( सावकार येतो. )

सावकार—आज्ञा महाराज !

राजा—तुझ्या घराची खिडकी पडली आहे का ?

सावकार—होय महाराज ! कोणीतरी पाडली असावी !

राजा—तर तुला फाशी ! याचा पाय बघ. तू खिडकी नीट बसविली नाहीस. याचा पाय मोडला. आता यानं जगावं कसं ?

सावकार—महाराज ! आपलं म्हणणं बरोबर आहे; पण खिडकी बसवण्यात माझी चूक नाही. सुतारानं ती नीट बसविली नसावी. मी त्याचे पैसे दिले आहेत.

राजा—बरोबर आहे तुझं म्हणणं ! बोलवा त्या सुताराला !

सुतार—आज्ञा महाराज !

राजा—सावकाराच्या घराची खिडकी तू तयार केलीस काय ?

सुतार—होय महाराज ! मी केली.

राजा—तर तुला फाशी ! तू खिडकी नीट केली नाहीस यामुळे याचा पाय मोडला. आता यान धंदा कसा करावा ? आणि जगाव कस ?

सुतार—महाराज ! आपलं म्हणणं बरोबर आहे. पण माझ्या खिडकीची चौकट ठीक आहे. ती गवंड्यानं नीट आवळली नाही म्हणून निसटून आली. यात माझी चूक काय बरं ?

राजा—बरोबर आहे सुताराचे ! बोलवा त्या गवंड्याला !

गवंडी—आज्ञा महाराज !

राजा—या सावकाराचा वाडा कोणी बांधला ?

गवंडी—मीच बांधला महाराज !

राजा—मग तुला फाशी ! तू खिडकी भिंतीत नीट आवळली नाहीस आणि त्यामुळे ती निसटून आली व याचा पाय मोडला.

गवंडी—महाराज ! त्यात माझी चूक नाही. भिंतीजवळ रस्त्यावर एक साळी लुगडी विकत बसतो. तो लुगडी घेणाऱ्या बायकांशी नेहमी भांडतो. त्यांच्या भांडणाकडं माझं लक्ष गेलं. त्यामुळं चुना कमी पडला असेल, म्हणून खिडकी निसटली असावी.

राजा—बोलवा त्या साळ्याला !

साळी—आज्ञा महाराज !

राजा—कायरे ! तू सावकाराच्या घराशेजारी लुगडी विकत बसतोस काय ?

साळी—होय महाराज ! मी तर बसतोच ! पण माझे वडील आणि आजोबाही तिथंच बसत होते. तीन पिढ्यांची वहिवाट आहे महाराज !

राजा—तर मग तुला फाशी ! तू गिऱ्हाइकांशी भांडतोस. तुझ्या भांडणाकडे गवंड्याचं लक्ष गेलं. यामुळे खिडकी आवळताना भिंतीत चुना कमी लागला. व खिडकी पोकळ राहिली. म्हणून ती निसटून पडली व याचा पाय मोडला.

साळ्याला आपली बाजू मांडता आली नाही. त्याला फासाकडे नेले. साळी फार उंच होता. फास त्याच्या गळ्याला बसेना डोकं गेलं वर. आणि फास लागला छातीवर लोंबायला. फाशी देणारे नोकर अडचणीत पडले. ते राजाकडे आले.

नोकर—महाराज ! मोठी अडचण आली. साळी भला उंच आहे. फास त्याच्या गळ्याला बसत नाही.

राजा—कायरे मूर्ख आहात तुम्ही ! एवढ्यासाठी मजकडे आलात ? अरे ! त्या मापात बसेल असा एक पहायचा आणि देऊन टाकायचा फाशी.

नोकरांना आपली चूक समजली त्यांनी इकडं तिकडं पाहिलं. जवळच एक पहारेकरी पहारा करीत होता. खांद्यावर बंदूक टाकून इकडून तिकडे पहारा करीत होता. तो होता ठेंगू. ही शिकार बरी आहे, म्हणून त्या फाशी देणारांनी त्याला उचललं व फाशी देण्यासाठी नेलं.

पहारेकरी—अरे ! मला का फाशी ? माझी चूक काय ? मी इमानाने पहारा करतोय. कधी पेंगलो नाही, की बंदूक खाली ठेवली नाही.

फाशी देणारे—तुझं इमानाबिमान आम्हांला ठाऊक नाही, तू मापात बसतोस. सांग तुझी शेवटची इच्छा !


पहारेकरी--मला माझ्या गुरुला भेटवा !

( पहारेकरी गुरुला बोलावून आणतात )

गुरुजी—कायरे ! का तुला फाशी ?

पहारेकरी—( सर्व हकिकत सांगतो )

गुरुजी—आता तू म्हण, मला फाशी द्या. मी म्हणतो. तुला फाशी नको, मला फाशी द्या. मग तुझी फाशी चुकेल !



पहारेकरी ( फाशी देणारास )—झालं माझं बोलणं. द्या मला फाशी !

( फाशी देणारे त्याच्या गळ्याला फास अडकवितात, इतक्यात )

गुरुजी—त्याला नका फाशी देऊ ! मला फाशी द्या !

पहारेकरी—छे ! छे ! गुरुजींना कशाला ? मलाच फाशी द्या !

( फाशी देणारे पेचात पडले व राजाकडे गेले. )

फाशी देणारे—महाराज ! आता फारच मोठी अडचण आली !

राजा—काय झाले ?

फाशी देणारे—त्याचा गुरु आला आहे. तो म्हणतो मला फाशी द्या, आणि हा म्हणतो मला फाशी द्या. आता द्यावे तरी कोणाला फाशी ?

राजा—चला ! तुम्ही मूर्ख आहात ! मीच येतो तिथे ( फासाजवळ जाऊन ) का रे, का भांडता ?

गुरुजी—महाराज ! आता असा योग आहे की, या वेळी येथे जो फाशी जाईल त्याला स्वर्गातील इंद्राचे राज्य मिळेल आणि अशी संधी सोडून मी याला कसे ते राज्य मिळू देईन ?

राजाला आनंद झाला. येथे माणसांवर राज्य करण्यापेक्षा स्वर्गात देवांवर राज्य करणे बरे ! म्हणून राजा म्हणाला, या दोघांना हकलून द्या ! आणि द्या मला फाशी ! म्हणून राजा स्वतःच फाशी गेला.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. ११३८३ नों दि ..........
वि. ........ ..........

# ४. एकनाथांची थोरवी

★

महाराष्ट्रात नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादी अनेक संतमंडळी होऊन गेली. या संतांनी आपल्या वागणुकीने समाजाला ज्ञान दिले. संत हे त्या त्या काळातील समाजाचे दीपस्तंभ होते. काम–इच्छा, क्रोध–राग, लोभ, मोह, मद, मत्सर–द्वेष. हे जे मानवाचे शत्रू त्यांच्यावर या महापुरुषांनी विजय मिळवला होता.

एकनाथ महाराज हे जातीने ब्राह्मण होते. ते पैठण येथे



राहात असत. त्यांच्याकडे एकदा त्यांच्या वडिलांचे श्राद्ध होते. त्या वेळी त्यांच्याकडे पुष्कळ मंडळी जेवावयास येणार होती. त्यांत बरेच ब्राह्मण होते. पण भुकेने व्याकूळ झालेल्या अस्पृश्य मंडळींनी त्यांच्याकडे अन्नाची मागणी करताच श्राद्धासाठी येणाऱ्या ब्राह्मणाच्या आधी त्यांनी महारांची पंगत बसविली व त्यांना जेऊ घातले.

असेच एकदा नदीवर आंघोळीस गेले असता तेथे वाळवंटात महाराचे एक चुकलेले व रडत असलेले मूल त्यांना दिसले. एकनाथांनी त्याला उचलून कडेवर घेतले. त्याचे डोळे पुसले व गावात येऊन तपास करून त्या मुलाच्या आईबापांच्या स्वाधीन केले. यावरूनही नाथांचे अंतःकरण किती थोर होते ते दिसून येते.

एकनाथांना राग आणण्याचा प्रयत्न अनेकांनी करून पाहिला. पण ते कधीही कोणावर रागावले नाहीत. एकनाथांना राग आणण्याची शर्यत लागली. पैठणला एक लोभी ब्राह्मण रहात होता. त्याला इतर ब्राह्मण म्हणाले, 'जर तू एकनाथांना राग आणलास तर तुला आम्ही दोनशे रुपये देऊ.' पैशाचे आशेने तो ब्राह्मण एकनाथांच्या घरी गेला व नाथांना वाटेल तसल्या शिव्या देऊ लागला. ती वेळ जेवणाची होती. नाथ दारात अतिथीची वाट पहात उभे होते. हा शिव्या देणारा ब्राह्मण अतिथी म्हणूनच आला, याबद्दल नाथांना आनंद झाला. त्यांनी त्याचे स्वागत केले आणि आपल्याबरोबर जेवावयास बसविले.

तो ब्राह्मण नाथांना राग आणण्याची पैज मारून आला होता. त्याचा पहिला प्रयत्न वरीलप्रमाणे वाया गेल्यामुळे तो खजील झाला होता. पण अपयश आल्यामुळे मनात चिडला होता. वाढा-

वयास नाथांच्या पत्नी गिरजाबाई आल्या. त्या खाली वाकून वाढू लागल्याबरोबर हा ब्राह्मण उठला व उडी मारून गिरजाबाईंच्या पाठीवर बसला. यामुळे तरी नाथ रागावतील असे त्याला वाटले होते. परंतु तसे घडले नाही. उलट नाथ आपल्या बायकोस हसत-हसत म्हणाले, “ सांभाळ हं ! भटजी पडतील. ” त्यावर गिरजाबाई म्हणाल्या, “ माझ्या मुलांना पाठीवर घेऊन वाढावयाची मला संवय आहे. ”

हे ऐकून ब्राह्मण खजील झाला. त्याने खरा प्रकार नाथांना सांगितला. एकनाथांनी जेवण झाल्यावर दोनशे रुपये दक्षिणा म्हणून त्या ब्राह्मणास देऊन हसतमुखाने परत पाठविले.

यानंतर नाथांची परीक्षा पहाण्याचा व त्यांना राग आणण्याच आणखी एक प्रयत्न झाला. एकनाथमहाराज नदीवर आंघोळ करून घाटावरून देवदर्शनास चालले होते. घाट चढून वर आल्याबरोबर तेथील मुसलमान चौकीदार पान खाऊन नाथांच्या अंगावर थुंकला. या प्रकारानेदेखील नाथ चिडले नाहीत. ते परत नदीवर गेले आणि पुन्हा आंघोळ करून परत आले. परतही त्या चौकीदाराने पान खाऊन नाथांच्या अंगावर पिचकारी मारली. तरी नाथ त्याच्यावर रागावले नाहीत. परत नदीवर गेले व आंघोळ करून आले. परत त्यांच्या अंगावर तो चौकीदार थुंकला. असा प्रकार १०८ वेळा घडला. दर वेळी नाथांनी आंघोळ करून यावे व या चौकीदाराने त्यांच्या अंगावर थुंकावे. इतका प्रकार होऊनही नाथ रागावत नाहीत असे पाहून चौकीदाराने दोन्ही हातानी नाथांचे पाय धरले आणि पायावर डोके ठेवून पाया पडला व आपल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप व्यक्त करून त्याने नाथांची क्षमा मागितली. त्या वेळी नाथ म्हणाले,

" मी तुमचा आभारी आहे. कारण आज तुम्ही मला १०८ वेळा स्नानाचे पुण्य मिळवून दिले."

संत किती थोर विचाराचे असतात याची यावरून खात्री पटते. यानंतर लोकांनी एकनाथांचा छळ करण्याचे सोडून दिले. संतांनी लिहिलेले ग्रंथ मिळवून जर लोकांनी वाचले तर त्यांच्या विचाराचा परिणाम लोकांवर होऊन लोकांमध्ये चांगले विचार व आचार वाढतील आणि लोकशाहीत त्याची मोठी गरज आहे.

# ५. दोघांचीही चोरी झाली

★

एक होते खेडेगाव. त्या खेडेगावात रामराव नावाचा एक शेतकरी रहात होता. तो मोठा पैलवान होता. कुस्ती हा त्याचा पेशा असल्यामुळे त्याच्या अंगात खूप ताकद होती. त्याचे शरीर पीळदार व खुराक खाऊन मेहनतीने कमावलेले होते. चार जवान त्याच्या अंगावर आले, तर त्या चौघांना तो भारी होता. त्यांच्याशी लढा करून तो चौघांनाही हार खायला लावील इतका ताकदवान होता.

दिवस उन्हाळ्याचे होते. यामुळे रामराव रात्री अंगणात खाट टाकून झोपला होता. भरपूर व्यायाम घेऊन जेवण करून गार हवेत रामराव झोपलेले. तावडतोब त्यांना झोप लागली व डाराडूर घोरू लागले. मध्यरात्रीनंतर चार चोर आले, कुऱ्हाडी, बॅटऱ्या घेऊन गावात शिरले. प्रथम त्यांना रामरावाचे घर लागले. घोरत पडलेल्या या गृहस्थाकडे पाहून चोरांना वाटले, " ठीक आहे. " म्हणून दोनचार त्याच्या उशापायाशी हत्यारबंद उभे राहिले. एक-जण आल्यागेल्यांच्या टेहळणीवर राहिला व चौथ्याने रामरावच्या घरात प्रवेश केला आणि बॅटरीच्या सहाय्याने महत्त्वाच्या चीजवस्तू असलेल्या पेट्या उघडल्या. भारी कपडे, दागिने, रोकड काढून घेतली आणि बाहेर आला व चौघेही रस्त्याला लागले. रामराव डारडूर घोरत पडला होता.

रामरावची चोरी करून चोर पुढे चालले. वाटेत त्यांना शामरावाचे घर लागले. तेही चांगले दिसले. तेव्हा या घरात काही

मिळते का पहावे म्हणून ते चौघेही चोर तिकडे वळले. शामरावही झोपी गेला होता. पण तो अशक्त आणि किडकिडीत व आजारीच गृहस्थ असल्यामुळे त्याला झोप लागली नव्हती. तो जागाच होता. चोरानी बॅटरीचा झोत टाकला. शामरावाने पांघरुणामधून त्यांच्या हातातील लखलखीत हत्यारे भाला, कुऱ्हाड पाहिली. शामराव घाबरला. चोरांनी रामरावच्या येथे योजना केल्याप्रमाणे भाला व कुऱ्हाड सरसावून शामरावच्या उशापायशाला दोघे उभे राहिले व दुसरे दोघे एक टेहळणीवर आणि दुसरा घरातील महत्त्वाच्या वस्तूच्या पेट्या शोधू लागला. शामराव जागाच होता. पण आपणांला चोरांनी मारू नये म्हणून तोंडावर पांघरून घेऊन घोरू लागला. घोरणाचे सोंग होते. डोळे उघडे होते. डोळ्यादेखत त्याची चोरी झाली. चोरांनी महत्त्वाचे कपडे, दागिने, रोकड हाती पडताच रस्ता धरला.

चोर रस्त्याला लागल्यानंतर शामराव उठला व चोर चोर म्हणून मोठ्याने ओरडून त्याने बोंब मारली. त्याबरोबर गल्लीतले तरूण व इतर लोकही उठले व शामरावाच्या घरापुढे जमले. 'काय झाले? चोर कोणीकडे गेले?' इ० विचारू लागले. शामरावने रस्त्याकडे बोट दाखवताच लोक त्या रस्त्याने 'धरा, पकडा, चोर चोर' असे ओरडत रस्त्याने पळू लागले. ती गडबड ऐकून रामरावही जागा झाला. 'अरे, का पळता.! काय झाले?' लोक म्हणाले, 'शामरावची चोरी झाली. चोराला पकडायला निघालो. तूही चल.'

रामरावला शामरावाची चोरी झाल्याचे ऐकून वाटले, आपली तर चोरी झाली नाही ना? उठून दाराकडे पाहतो तर दार उघडे. गडबडीने उठला व दिवा लावून घरात पहातो, तर सर्व पेट्या

घडयाचा व अस्ताव्यस्त पडलेल्या. पाहू लागला तर त्यात महत्त्वाचे जिन्नस, पैसे काहीच नाही. मग रामराव लोकांना सांगू लागला, 'अरे माझीही चोरी झाली आहे.'


दोघांचीही चोरी झाली. रामरावाच्या अंगांत ताकद होती. तो चार लोकांना भारी होता. मग त्याची चोरी का झाली? तो झोपला होता. जागा नव्हता. आणि शामराव जागा असून त्याची चोरी का झाली? तर तो जागा होता. पण त्याच्या अंगात ताकद नव्हती. चार लोकांना विरोध करण्याइतकी त्याला शक्ती नव्हती.



आज आपल्या समाजाची स्थिती काहीशी रामराव व शामरावसारखीच आहे. बहुजन समाज अज्ञानी असल्यामुळे तो राबतो. उत्पन्न करतो. पण बाजारात कष्टाची किंमत घेऊ शकत नाही. त्याला दरात, वजनात, मापात फसविले जाते. तो लुबाडला जातो. यामुळे दरिद्रीच राहतो. तसेच शामरावसारख्या बुद्धिवान् पण शारीरिक सामर्थ्य नसलेला रोगी मनुष्यही आपल्याजवळ असलेले सांभाळू शकत नाही व त्याचा उपभोग घेऊ शकत नाही.

यासाठी बहुजन समाज ताकदवान्, संघटित व बुद्धिमान् आणि जागृत असला पाहिजे, म्हणजे लुबाडला जाणार नाही.

◆◆◆



# ६. पुस्तकी विद्या

★

एक खेडेगाव होतं. तिथे गोपाळ नावाचा एक ब्राह्मण जातीचा मुलगा होता. त्याला व्यवहारज्ञान काहीच नव्हतं. त्यानं एक दिवस चांदण्यात बसून बोलत असलेल्या मंडळींचे बोलणे ऐकले. चांदणी रात्र प्रवासास चांगली, हे ऐकून चांदणी रात्र पाहून तो एक दिवस प्रवासास निघाला.




याप्रमाणे फिरत फिरत तो काशीस गेला व तेथे एका पंडिताजवळ राहिला. पंडिताकडून तो विद्या शिकला. तोही मोठा पंडित झाला. ज्या पंडिताजवळ शिकला त्याला एकुलती एक मुलगी होती. पंडिताजवळ पैसा-अडका-दागदागिने वगैरे खूप संपत्ती होती. एखादा चांगला शिकलेला मुलगा पाहून त्याला आपली मुलगी द्यावी आणि त्यालाच सर्व संपत्ती देऊन, घरजावई करून घ्यावे, असे पंडिताने

ठरविले. गोपाळ चांगला देखणा व शिकलेला मुलगा आहे असे पाहून त्याने गोपाळशी आपल्या मुलीचे लग्न लावून दिले. जावईबापूस सांगितले, " बाबारे, आम्ही आता म्हातारे झालो. ही सर्व संपत्ती घेऊन सुखाने रहा. हे सर्व तुझेच आहे. चांगले सांभाळशील तर तुला पिढ्यान्-पिढ्या पुरेल इतके द्रव्य आहे; पण माणसाने बसून खाऊ नये. काहीना काही उद्योग करावा. "



सासऱ्याचा उपदेश ऐकून गोपाळाने कुदळ घेतली आणि सासऱ्याच्या घराची भिंत पाडण्यास आरंभ केला. सासऱ्याने विचारले, " अहो जावईबापू! हे काय करता ? " तो म्हणाला, " तुम्हीच म्हणाला ना, माणसाने काहीना काही उद्योग करावा. मी उद्योग करतो आहे. शास्त्रांतही सांगितलं आहे ' उद्योगं पुरुषलक्षणं ' हे जावयाचे बोलणे ऐकून सासऱ्यास कळले की, हा पंडित झाला खरा; पण याला व्यवहारज्ञान काहीच आले नाही. मग सासऱ्याने जावयास जानवी करण्याचा उद्योग दिला.

पुढे त्याची बायको वयात आल्यावर अधिक सुंदर दिसू लागली. एक दिवस रात्री महालात गेला असता बायकोचे सौंदर्य पाहून त्याला आठवले, "कांता रूपवती शत्रुः" सुंदर बायको ही शत्रू आहे. मग हिचे सौंदर्य नाहीसे केले पाहिजे. काय करावे ? असा विचार करीत असता त्याला आठवले, " नासिका मुखमंडणं " नाक हे सौंदर्याचे खरे लक्षण आहे. अर्थात् नाक कापून टाकले तर बायकोचे सौंदर्य नाहीसे होईल. म्हणून बायको झोपेत असताना तिचे नाक पकडून ते कापण्याचे त्याने ठरविले. आणि त्याने बायकोचे नाक धरून तो ते कापण्याचा प्रयत्न करू लागला. त्याबरोबर बायको जागी होऊन मोठमोठ्याने ओरडू लागली. सासू-सासरे जागे झाले व याच्या महालाकडे धावले. त्यांनी तो प्रकार पाहिला आणि त्यास विचारले, " अहो जावईबापू, मुलीने असा कोणता अपराध केला, म्हणून तुम्ही तिचे नाक कापता ? " त्याने शास्त्रवचन सांगितले. ते ऐकून सासऱ्याने ठरविले, या मूर्खाला काहीच व्यवहारज्ञान नाही. याला घरात बाळगून काही उपयोग नाही. केव्हा तरी हा मुलीचा घात करील. म्हणून त्याने त्यास जाण्यास सांगितले.

गोपाळ जाण्याची तयारी करून सासूजवळ गेला व मी गावी निघालो आहे, करिता काही खावयास करून द्यावे, म्हणून मागणी केली. सासूने त्यास काही गोड गोड पदार्थ करून बांधून दिले. ते घेऊन तो निघाला. दरवाजात आल्यावर त्यास आठवले " एकट्याने गमन करू नये. पाचांबरोबर जावे. " पण सोबती कोठून आणणार ? इतक्यात चारजण प्रेत घेऊन व एकजण अग्नी घे[illegible]

असलेले त्याला दिसले. त्यांच्य[illegible]

गेल्यावर त्या मंडळींनी प्रेतास[illegible]

यानेही आंघोळ केली व फ[illegible]

" एकट्याने खाऊ नये. [illegible]

बरोबर आणले होते, ते मित्र म्हणून खाण्यासाठी त्या प्रेतवाहकांस त्याने बोलावले. ते कसे येणार ? ते आले तर नाहीतच; पण उलट ते गोपाळवर रागावले व मग तो हिरमुरला होऊन निघून गेला.

यावरून माणसाला व्यवहारज्ञानाची फार गरज आहे. केवळ पुस्तकी विद्येवर माणसास आपले जीवन जगतां येत नाही, हे लक्षात घेऊन माणसांनी समाजात वागले पाहिजे.

◆◆◆

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
IRBK-0111393
वाचनालय शाखा.